# विधेयक क्र. ६४ मध्ये करावयाची सुधारणा

## "सहपत्र-अ" दिनांक:- जानेवारी, २०२४

| अ.क्र. | कलम | पूर्वीची तरतूद | विधेयक क्र. ६४ नुसार सूचविलेली सुधारणा |
|---|---|---|---|
| १ | १ (१) | (१) या अधिनियमास महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ असे म्हणावे. | या अधिनियमास महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन ~~(विकास व विनियमन)~~ (प्रचालन व सुविधा) अधिनियम, १९६३ असे म्हणावे. |
| २ | २ (१) | (अ) "कृषि उत्पन्न" याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले शेती, फलोत्पादन, पशुसंवर्धन, मधुमक्षिकापालन, मत्स्यसंवर्धन, मत्सव्यवसाय व वन यापासून मिळणारे सर्व उत्पन्न असा आहे. (मग ते प्रक्रिया केलेले असो वा नसो : | "कृषि उत्पन्न" याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले शेती, फलोत्पादन, ~~पशुसंवर्धन,~~ "पशुधन" मधुमक्षिकापालन, मत्स्यसंवर्धन, मत्सव्यवसाय व वन यापासून मिळणारे सर्व उत्पन्न असा आहे. (मग ते प्रक्रिया केलेले असो वा नसो : |
| ३ | | (ब) " शेतकरी" याचा अर्थ, जी व्यक्ती सामान्यपणे आपण स्वत: किंवा मजुरीने लावलेल्या मजुरांकरवी किंवा अन्यथा, ज्यावर प्रक्रिया करण्यात आलेली नसेल अशा कृषि उत्पन्नाची पैदास किंवा वाढ करण्यात गुंतलेली असेल अशी व्यक्ती, असा आहे. परंतु त्यात कृषि उत्पन्नाचा किंवा त्याच्या संबंधातील व्यापारी, अडत्या, प्रक्रियाकार किंवा दलाल, शासनाचा किंवा कोणत्याही सहकारी संस्थेचा किंवा कोणत्याही बाजार समितीचा कर्मचारी अथवा व्यापारी भागीदारी संस्थेतील किंवा औद्योगिक प्रसंस्थेतीतील भागीदार यांचा मग असा व्यापारी, अडत्या, प्रक्रियाकार, दलाल, शासनाचा किंवा किंवा कोणत्याही सहकारी संस्थेचा किंवा कोणत्याही बाजार समितीचा कर्मचारी किंवा व्यापारी भागीदारी संस्थेतील अथवा औद्योगिक प्रसंस्थेतील भागीदार हा कृषि उत्पन्नाची पैदास किंवा वाढ करण्यात गुंतलेला असला तरीही त्याचा समावेश होणार नाही: | (ब) " शेतकरी" याचा अर्थ, जी व्यक्ती सामान्यपणे आपण स्वत: किंवा मजुरीने लावलेल्या मजुरांकरवी किंवा अन्यथा, ज्यावर प्रक्रिया करण्यात आलेली नसेल अशा कृषि उत्पन्नाची पैदास किंवा वाढ करण्यात ~~गुंतलेली असेल अशी व्यक्ती, असा आहे.~~ " तसेच पशुपालनात गुंतलेली असेल अशी व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी केलेला, आणि सदस्य शेतकऱ्यांचे सामुदायिक कृषि उत्पन्न घेयात तसेच पशुपालनात गुंतलेला शेतकरी संघ मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो" परंतु त्यात कृषि उत्पन्नाचा किंवा त्याच्या संबंधातील व्यापारी, अडत्या, प्रक्रियाकार किंवा दलाल, शासनाचा किंवा कोणत्याही सहकारी संस्थेचा किंवा कोणत्याही बाजार समितीचा कर्मचारी अथवा व्यापारी भागीदारी संस्थेतील किंवा औद्योगिक प्रसंस्थेतीतील भागीदार यांचा मग असा व्यापारी, अडत्या, प्रक्रियाकार, दलाल, शासनाचा किंवा किंवा कोणत्याही सहकारी संस्थेचा किंवा कोणत्याही बाजार समितीचा कर्मचारी किंवा व्यापारी भागीदारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | संस्थेतील अथवा औद्योगिक प्रसंस्थेतील भागीदार हा "पशुपालनासह" कृषि उत्पन्नाची पैदास किंवा वाढ करण्यात गुंतलेला असला तरीही त्याचा समावेश होणार नाही: |
| ४ | | नवीन | **"स्पष्टीकरण-** या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कोणतीही व्यक्ती-शेतकरी आहे किंवा नाही याबाबत कोणताही प्रश्न उद्भवल्यास अशी व्यक्ती ज्या शेतीविषयक कामामध्ये गुंतलेली असेल त्या क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या मामलेदाराकडे तो प्रश्न निर्णयार्थ निर्देशित करील आणि त्यावरील मामलेदाराचा निर्णय अंतिम असेल." |
| ५ | | (ब-अ) नवीन | **"मूल्यमापन प्रयोगशाळा"** याचा अर्थ, वाणिज्यिक निकष किंवा श्रेणी-मानके यांनुसार गुणवत्ता निकषाच्या चाचणीकरिता, संचालकाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, उभारलेली प्रयोगशाळा असा आहे." |
| | २(१)(ड) | (ड) □उपविधी□ याचा अर्थ, कलम ६१ अन्वये केलेले उपविधी | (ड) "उपविधी" याचा अर्थ, कलम ६१ व कलम ६१अ ची पोट कलमे (१) किंवा (२) अन्वये केलेले उपविधी |
| ६ | | (ड-अ) नवीन | **"शीतगृह"** याचा अर्थ कृषि उत्पन्नाचे परिरक्षण करण्याकरिता, शितलीकरण, गोठवणे व साठवणे यासाठी उद्देशित केलेली संयंत्रणा, असा आहे." |
| ७ | | ~~(इ-अ) "थेट-पणन" याचा अर्थ, कलम ५ (ड) च्या पोट-कलम (१) अन्वये प्रत्यक्ष पणन लायसन धारकाने, शेतकऱ्यांकडून, कृषि उत्पन्नाची केलेली थेट खरेदी, असा आहे:~~ | "(ईअ)" "थेट पणन" याचा, कृषि उत्पन्नाच्या संबंधातील अर्थ, कलम ५ड च्या पोट-कलम (१) अन्वये एखाद्या थेट पणन लायसनधारकाने या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये प्रमुख बाजारतळाच्या, उप बाजारतळाच्या, खाजगी बाजारतळाच्या आणि बाजार उपतळाच्या बाहेर, प्रक्रियाकार, निर्यातक आणि संघटीत किरकोळ व्यापारी श्रृंखलेतील चालक (रिटेल चेन ऑपरेटर) यांनी कंत्राटी शेती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | व्यवस्थेंअंतर्गत शेतकऱ्यांकडून कृषि उत्पन्नाची केलेली थेट घाऊक खरेदी, असा आहे.” |
| ८ | | (ई-५) नवीन | “(ई-५)” **सीमांकित बाजार क्षेत्र”** याचा अर्थ, बाजार समितीच्या सदस्यांच्या निवडणूकीच्या प्रयोजनार्थ आणि त्याच्याशी संबधित विकासासाठी पणन उपक्रम हाती घेण्याकरिता, कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेले भौगोलिक क्षेत्र, असा आहे. |
| ९ | | (फ) “संचालक" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्यासाठी संचालक, कृषि पणन म्हणून नेमलेली व्यक्ती असा आहे आणि त्यामध्ये, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे या अधिनियमाच्या किंवा उपविधीच्या तरतुदीखाली संचालकास असलेल्या अधिकारापैकी, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील, अशा अधिकारांचा वापर करण्याचा व अशी कार्ये पार पाडण्याचा अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा किंवा अधिकाऱ्यांचा समावेश होतो: | “संचालक" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्यासाठी “पणन मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकाखेरीज” संचालक, कृषि पणन म्हणून नेमलेली व्यक्ती असा आहे आणि त्यामध्ये, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे या अधिनियमाच्या किंवा उपविधीच्या तरतुदीखाली संचालकास असलेल्या अधिकारापैकी, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील, अशा अधिकारांचा वापर करण्याचा व अशी कार्ये पार पाडण्याचा अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा किंवा अधिकाऱ्यांचा समावेश होतो: |
| १० | | (फ-१ड) नवीन | “(फ-१ड)” **“निर्यात**” याचा अर्थ, कृषि उत्पन्न भारताबाहेर पाठवणे असा, आहे.” |
| ११ | | (फ-१क) नवीन | “(फ-१क)” **“शेतकरी उत्पादक कंपनी”** याचा अर्थ, कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये किंवा कंपन्यांच्या विधी संस्थापनाशी संबधित इतर कोणत्याही कायद्यान्वये विधी संस्थापित केलेली, शेतकरी उत्पादक सदस्यांची कंपनी,असा आहे.” |
| १२ | | (फ-१ख) नवीन | “(फ-१ख)” **“वित्तीय वर्ष”** याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, राज्य शासनाने वेळोवेळी वित्तीय वर्ष म्हणून घोषित केलेला कालावधी, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | असा आहे. |
| १३ | | (फ-१क) नवीन | "(फ क)" **"पशुधन"** याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गायी, म्हशी, बैल, वळू, शेळया आणि मेंढया असा आहे, आणि त्यामध्ये कुक्कुटपालन, मत्स्य आणि त्यांसारखे इतर प्राणी, आणि त्यांची उत्पादने यांचा समावेश होतो. |
| १४ | | (ग-अ) ~~"व्यवस्थापक संचालक" याचा अर्थ, कलम ३९ब-१ अन्वये राज्य सरकाने नियुक्त केलेला राज्य पणन मंडळाचा व्यवस्थापक संचालक;~~ | (ग-अ) **"व्यवस्थापकीय संचालक"** याचा अर्थ, संचालक, कृषि पणन वगळता राज्य शासनाने कलम ३९ब-१ अन्वये राज्य पणन मंडळाचा व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त केलेली एखादी व्यक्ती, असा आहे. तथापि, इलेक्ट्रॉनिक पणन व्यासपीठाच्या बाबतीत व्यवस्थापकीय संचालकाचा अर्थ, पशुधनासह आणि कृषि उत्पन्नाकरिता इलेक्ट्रॉनिक पणन व्यासपीठ कार्यान्वित करण्यासाठी व त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी लायसन दिलेल्या कायदेशीर व्यक्तींची मुख्य कार्यकारी व्यक्ती, असा आहे." |
| १५ | | (जे-१) नवीन | (जे-१) कृषि उत्पन्नाच्या संबंधातील "पणन" याचा अर्थ, कृषि उत्पन्नाच्या हंगामाच्या टप्प्यापासून सुरु होणाऱ्या उत्पादनाच्या निर्मिती बिंदूपासून ते कृषि उत्पन्न शेवटच्या ग्राहकापर्यंत पोहोचण्याचा ओघात अंतर्भूत असलेली सर्व कामे म्हणजेच कृषि उत्पन्नाची प्रतवारी, प्रक्रिया साठवण, वाहतूक, वितरणप्रणाली ही कामे आणि स्वत: उत्पादकाखेरीजच्या इतरांनी हाती घेतलेली असेल अशा प्रक्रियेत अंतर्भूत असलेली इतर सर्व कार्ये, असा आहे. |
| १६ | | (जे-२) नवीन | (जे-२) **"बाजार उप-तळ"** याचा अर्थ वखार, साइलो, शीतगृह किंवा कलम ५क-ब अन्वये बाजार उप-तळ म्हणून घोषित केलेली किंवा बाजार तळ म्हणून मानण्यात येणारी अशी इतर कोणतीही संरचना |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | किंवा जागा, असा आहे. |
| १७ | | (जे-३) नवीन | (जे-३) सीमांकीत बाजार क्षेत्राच्या संबंधातील "बाजारतळ" यामध्ये, शासनाने अधिसूचित केलेल्या आणि कृषि उत्पन्न व पशुधन बाजार समितीकडून व्यवस्थापन केले जाणारे व चालविले जाणारे, अशा सीमांकित बाजार क्षेत्रामधील प्रमुख बाजारतळ, उप-बाजारतळ व उप-तळ, यांचा समावेश आहे. |
| १८ | | (जे-४) नवीन | (जे-४) "राष्ट्रीय नामांकित बाजार तळ" याच अर्थ, या अधिनियमाच्या कलम ५क-अ मध्ये निर्दिष्ट केलेले राष्ट्रीय नामांकित बाजार तळ, असा आहे" |
| १९ | | (के-१) नवीन | (के-१) "राष्ट्रीय कृषि बाजार (नाम)" याचा अर्थ, जेथे त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यास बाध न येता भारतात कोणत्याही वेळी व ठिकाणी पणन सेवेद्वारे कृषि उत्पन्नाची खरेदी व विक्रीची आणि त्यांच्याशी अनुषंगिक अशी कामे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पार पाडली जातात असा एकात्मीकृत बाजार, असा आहे." |
| २० | | (के-२) नवीन | (के-२) व्यापाऱ्याच्या संबंधात **"अत्याधिक व्यापार"** याचा अर्थ, बाजार समितीकडे किंवा इलेक्ट्रॉनिक व्यापार व्यासपीठावर व्यापार करण्याकरिता त्याने जमा केलेली प्रतिभूतीची रक्कम किंवा सादर केलेली पत-मर्यादा नि-बँक हमी यांच्या रक्कमेच्या तुलनेत, कोणत्याही वेळी खरेदी केलेल्या कृषि उत्पन्नाच्या मूल्याहून अधिक रकमेचा व्यापार, असा आहे. |
| २१ | | (ल-१) नवीन | (ल-१) "व्यक्ती" यामध्ये व्यक्ती, सहकारी संस्था, हिंदू अविभक्त कुटूंब, कंपनी किंवा भागीदारी संस्था किंवा संघ किंवा व्यक्तींचा निकाय,-मग तो विधिसंस्थापित असो किंवा नसो, आणि शासकीय |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | संघटना आणि अशासकीय संघटना याचा समावेश आहे." |
| २२ | | (म-अ) "खाजगी बाजार" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ५-ड च्या पोटकलम (१) अन्वये घोषित करण्यात आलेली विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती, असा आहे: | म-अ) "खाजगी बाजार **तळ"** याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ५-ड च्या पोटकलम (१) अन्वये घोषित करण्यात आलेली विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती, असा आहे: |
| २३ | | (म-ब) नवीन | (म-ब) "बाजार तळाच्या संबंधातील **"प्रक्रिया युनिट"** याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ५क ब अन्वये बाजार उप-तळ म्हणून घोषित केलेले प्रक्रिया युनिट, असा आहे. |
| २४ | | (न-१) नवीन | (न-१) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरुन कलम ३९के अन्वये राज्य पणन मंडळाने केलेले विनियम असा आहे." |
| २५ | | (र-१अ) नवीन | (र-१अ) **"विक्रेता"** याचा अर्थ, जी किंमत घेऊन कृषि उत्पन्नाची विक्री करते किंवा विक्री करण्याचे मान्य करते अशी कोणतीही व्यक्ती, तसेच शेतकरी असा आहे." |
| २६ | | (र-१ब) नवीन | (र-१ब) **"साइलो"** याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ५क-ब अन्वये बाजार उप-तळ म्हणून घोषित केलेले साइलो, असा आहे." |
| | | (र-१) "विशेष वस्तूचा बाजार" म्हणजे कलम ४ च्या पोट कलम (४) अन्वये घोषित केलेला बाजार | "विशेष वस्तूचा बाजार तळ" म्हणजे कलम ४ च्या पोट कलम (४) अन्वये घोषित केलेला बाजार |
| २७ | | (ट-अ) नवीन | (ट-अ) बाजारतळाच्या संबंधातील **"वखार"** याचा अर्थ, घोषित केलेले कृषि उत्पन्न (ठेवीदारांच्या वतीने माल) साठवण्यासाठी असलेली, किंवा त्या प्रयोजनार्थ वापरता येईल अशी कोणतीही इमारत, संरचना किंवा इतर संरक्षित केलेली परिवेष्टित जागा, असा आहे आणि त्यामध्ये महाराष्ट्र वखार अधिनियमान्वये लायसन दिलेली किंवा वखार महामंडळ अधिनियम, १९६२ अन्वये चालविण्यात येणारी वखार, यांचा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | समावेश होतो, परंतु त्यामध्ये हॉटेल, रेल्वेस्टेशन, बंदर यांस जोडून असलेले कोठारगृह किंवा तत्सम स्वरुपाची कोणतीही जागा यांचा समावेश होणार नाही." |
| २८ | ४(१) | कलम ३ अन्वये काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर, राज्य शासन असा कालावधी समाप्त होण्यापूर्वी कोणतेही आक्षेप व सूचना आल्या असल्यास त्यांचा विचार करील आणि त्यास आवश्यक वाटल्यास, विहीत रितीने चौकशी करील.<br>त्यानंतर, राज्य शासनाला, शासकीय राजपत्रातील दुसऱ्या अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या पणनाचे या अधिनियमान्वये विनियमन करण्यात येईल असे जाहीर करता येईल. याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र हे बाजार क्षेत्र असेल. या कलमान्वये काढलेली अधिसूचना, त्या क्षेत्रात खप असलेल्या मराठी भाषेतील वृत्तपत्रात प्रसिध्द करता येईल, आणि तसेच पूर्वोत्क घोषणा त्या क्षेत्रातील व्यक्तीच्या निदर्शनास अधिक चांगल्या रीतीने यावी या हेतूने राज्य शासनाच्या मते योग्य असेल अशा इतर कोणत्याही रीतीने, अशी अधिसूचना प्रसिध्द केली जाईल. | कलम ३ अन्वये काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर, राज्य शासन असा कालावधी समाप्त होण्यापूर्वी कोणतेही आक्षेप व सूचना आल्या असल्यास त्यांचा विचार करील आणि त्यास आवश्यक वाटल्यास, विहीत रितीने चौकशी करील.<br>त्यानंतर, राज्य शासनाला, शासकीय राजपत्रातील दुसऱ्या अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या पणनाचे या अधिनियमान्वये विनियमन करण्यात येईल असे जाहीर करता येईल. याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र हे बाजार क्षेत्र असेल. " आणि तसेच, अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र हे, बाजार समितीच्या सदस्यांच्या निवडणूकीच्या, प्रयोजनार्थ, भौगोलिक दृष्टया सीमांकित केलेले बाजार क्षेत्र म्हणून घटीत होईल" या कलमान्वये काढलेली अधिसूचना, त्या क्षेत्रात खप असलेल्या मराठी भाषेतील वृत्तपत्रात प्रसिध्द करता येईल, आणि तसेच पूर्वोक्त घोषणा त्या क्षेत्रातील व्यक्तीच्या निदर्शनास अधिक चांगल्या रीतीने यावी या हेतूने राज्य शासनाच्या मते योग्य असेल अशा इतर कोणत्याही रीतीने, अशी अधिसूचना प्रसिध्द केली जाईल. |
| २९ | | नवीन | **स्पष्टीकरण-** बाजार समिती, तिच्या सीमांकित बाजार क्षेत्रात कृषि उत्पन्नाच्या आणि पशुधनाच्या पणनाचे विनियमन करणार नाही. बाजार समिती प्रमुख बाजार तळ, उप-बाजार तळ व बाजार उप-तळ यांतील कृषि उत्पन्नाच्या व पशुधनाच्या पणनाचे विनियमन करील." |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | ४(३) | (३) कलम ३ च्या तरतुदींच्या अधीनतेने, राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणत्याही वेळी बाजार क्षेत्रातून, कोणतेही क्षेत्र वगळता येईल किंवा त्यात जादा क्षेत्र समाविष्ट करता येईल किंवा कोणत्याही बाजार क्षेत्रात कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन बंद करावे, किंवा कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या (आत्तापर्यंत विनियमन) न झालेल्या पणनाचे बाजार क्षेत्रात विनियमन करावे, असा निदेश देता येईल. | कलम ३ च्या तरतुदींच्या अधीनतेने, राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणत्याही वेळी **"सीमांकीत"** बाजार क्षेत्रातून, कोणतेही क्षेत्र वगळता येईल किंवा त्यात जादा क्षेत्र समाविष्ट करता येईल किंवा कोणत्याही बाजार **"तळ"** क्षेत्रात कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या पणनाचे विनियमन बंद करावे, किंवा कोणत्याही कृषि उत्पन्नाच्या (आत्तापर्यंत विनियमन) न झालेल्या पणनाचे ~~बाजार क्षेत्रात विनियमन~~ **"बाजार तळ क्षेत्रात विनियमन"** करावे, असा निदेश देता येईल. |
| ३१ | ४(४) | (४) ~~राज्य शासनास, विशिष्ट कृषि उत्पन्नाच्या उलाढालीचा आणि त्यासाठी लागणाऱ्या विशेष पायाभूत सुविधांचा विचार करुन, कोणत्याही क्षेत्रासाठी, विद्यमान बाजाराशिवाय विशेष वस्तूंचा बाजार राजपत्रातील अधिसूचनेद्वारे घोषित करता येईल.~~ | "राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, विशिष्ट कृषि उत्पन्नाची किंवा पशुधनाची उलाढाल आणि त्यांच्या पणनासाठी आवश्यक असलेल्या विशेष पायाभूत सुविधा विचारत घेतल्यानंतर, कोणत्याही बाजार क्षेत्राकरिता विद्यमान बाजराखेरीज, आणखी एखाद्या विशेष वस्तूंचा बाजार घोषित करता येईल. अशा बाजारात पुढील बाजार असू शकतील-<br>(एक) फळे, भाजीपाला व फुले यांचा बाजार तसेच कांदा बाजार, सफरचंद बाजार, संत्रा बाजार, मनुका बाजार, हळद बाजार, काजू बाजार:<br>(दो) कापूस बाजार :<br>(तीन) औषधी आणि सुगंधी वनस्पती बाजार:<br>(चार) पशुधन बाजार तसेच गुरे, शेळी, मेंढी, गाढव, घोडा बाजार, मच्छी बाजार, कुक्कुट पक्षी बाजार आणि त्यासारखे इतर बाजार: आणि<br>(पाँच) असे इतर कोणतेही बाजार<br>परंतु, दिनांक -------- २०२४ म्हणजेच महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (विकास व विनियमन) (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभापूर्वी विद्यमान मुख्य व दुय्यम बाजारांच्या बाबतीत आधी काढलेल्या अधिसूचना अंमलात राहतील. |
| ३२ | ५ (१) | ~~**बाजाराची स्थापना :**~~<br><br>~~(१) प्रत्येक बाजार क्षेत्रासाठी एक मुख्य बाजार स्थापन करण्यात येईल आणि एक किंवा अधिक दुय्यम बाजार स्थापन करण्यात येतील.~~ | **बाजाराची स्थापना :**<br>(१) राज्यामध्ये पुढील बाजार स्थापन करता येतील-<br>(अ) बाजार समितीकडून चालविले जाणारे मुख्य बाजार तळ किंवा बाजार तळे<br>(ब) बाजार समितीकडून चालविले जाणारे उप-बाजार किंवा बाजार तळे<br>(क) बाजार समितीकडून चालविले जाणारे बाजार उप-तळ किंवा बाजार उप-तळे<br>(ड) कलम ५ड अन्वय लायसन धारण करणाऱ्या एखाद्या व्यक्तीकडून चालविले जाणारे खाजगी बाजार तळ<br>(इ) कलम ५ड अन्वये लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीकडून चालविले जाणार खाजगी बाजार उप-तळ किंवा बाजार उप-तळे<br>(फ) बाजार व्यवस्थापन समितीकडून चालविले जाणारे शेतकरी-ग्राहक बाजार तळ किंवा बाजार तळे.<br>(ग) नियम ४ई अन्वये लायसन धारण करणाऱ्या एखाद्या व्यक्तीकडून चालविले जाणारे शेतकरी-ग्राहक बाजार तळ किंवा बाजार तळे<br>(ह) विशेष वस्तूंचे बाजार तळ<br>(आय) इलेक्ट्रॉनिक व्यापार व्यासपीठ<br>परंतु, दिनांक -------- २०२४ म्हणजेच महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (विकास व विनियमन) (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभापूर्वी विद्यमान मुख्य व दुय्यम बाजारांच्या बाबतीत आधी काढलेल्या अधिसूचना अंमलात राहतील. |
| ३३ | ५ (२) | ~~(२) संचालक, कलम ४ पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही बाजार क्षेत्रातील (कोणतीही संरचना, परिवेष्टित जागा, खुली जागा किंवा स्थान धरुन) कोणतीही जागा, त्या अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी मुख्य बाजार म्हणून स्थापन करील आणि त्यास, त्याच अधिसूचनेद्वारे किंवा तशाच अधिसूचनेद्वारे, अशा कृषि उत्पन्नाच्या पणनासाठी त्या बाजार क्षेत्रातील त्यासारख्या इतर कोणत्याही जागांमध्ये, दुय्यम बाजार स्थापन करता येतील.~~ | (२) शासन कलमे ३ व ४ यांअन्वये अधिसूचना निर्गमित केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, अधिसूचनेद्वारे या अधिनियमाखालील कृषि उत्पन्नाच्य आणि पशुधनाच्या पणनाचे प्रत्यक्ष, इलेक्ट्रॉनिक किंवा अशा इतर पध्दतीने व्यक्तपणे किंवा ध्वनितणे विनियमन करण्याच्या प्रयोजनार्थ, सीमांकित बाजार क्षेत्रातील कोणत्याही जागेस, समितीकडून चालविले जाणारे, यथास्थिती, मुख्य बाजार तळ किंवा उप-बाजार तळ किंवा बाजार उप-तळ किंवा शेतकरी — ग्राहक बाजार तळ म्हणून घोषित करील. |
| ३४ | | नवीन | **स्पष्टीकरण** — पोट-कलम (२) मधील, "जागा" या शब्दप्रयोगामध्ये, त्या सीमांकीत बाजारक्षेत्राच्या बाजार समितीकडे निहित असलेली कोणतीही संरचना, कुंपण, मोकळी जागा, स्थान, रस्ता तसेच वखार, साइलो, माल बांधाबांध गृह (पॅक हाऊस) गुणवत्ता मूल्यमापन प्रयोगशाळा, सफाई, प्रतवारी व आवेष्टन व प्रक्रिया युनिट यांचा समावेश होईल. |
| ३५ | ५ (३) | नवीन | **५(३)** शासनास, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाखालील कृषि उत्पन्नाचे व पशुधनाचे प्रत्यक्ष, इलेक्ट्रॉनिक किंवा अशा अन्य पध्दतीने व्यक्तपणे किंवा ध्वनितपणे पणन करण्याकरिता, कलम ५ड खालील एखाद्या लायसनप्राप्त "जागेस" यथास्थिती खाजगी बाजार तळ, खाजगी बाजार उप-तळ, खाजगी शेतकरी-ग्राहक बाजार तळ म्हणून घोषित करता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | | नवीन | **स्पष्टीकरण-** पोट-कलम (३) मधील "जागा" या शब्दप्रयोगामध्ये, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, लायसनधारक व्यक्तीकडे निहित असलेली कोणतीही संरचना, कुंपण, मोकळी जागा, स्थान, रस्ता तसेच वखार, साइलो, बांधाबांधगृह (पॅक हाऊस) गुणवत्ता मूल्यमापन प्रयोगशाळा, सफाई, प्रतवारी आणि आवेष्टन व प्रक्रिया युनिट यांचा समावेश होईल." |
| ३७ | ५ (क-अ) | नवीन | **(क अ)** कलम १३ च्या पोट कलम (१) अन्वये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, राज्य शासनास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, राष्ट्रीय नामांकित बाजार तळाच्या विनियमनाकरिता आवश्यक असलेले एकूण व्यवहार,मूल्य कमाल कार्य क्षेत्र, सेवा दिलेल्या ग्राहकांची किमान संख्या आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या विशेष पायाभूत सुविधा, यांसारखे कृषि उत्पन्नाच्या पणनासंबधीचे पैलू विचारात घेतल्यानंतर, कलम ५ अन्वये स्थापन केलेल्या कोणत्याही विद्यमान बाजार तळास "राष्ट्रीय नामांकित बाजार तळ" म्हणून निर्देशित करता येईल किंवा "राष्ट्रीय नामांकित बाजार तळ" म्हणून कोणत्याही बाजाराची स्थापना करता येईल आणि या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा बाजाराच्या पणनाचे विनियम हे, विहित करण्यात येईल अशा रीतीने करण्यात येईल.<br>परंतु विहीत, करण्यात येईल अशा वार्षिक टनभारापेक्षा किंवा, वार्षिक मूल्यापेक्षा कमी नसेल अशी बाजार तळाची उलाढाल "राष्ट्रीय नामांकित बाजार तळाचा" दर्जा प्रदान करण्यासाठी विचारात घेण्यात येईल.<br>परंतु आणखी असे की, अशा वार्षिक टनभारापैकी किंवा अशा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वार्षिक मूल्यापैकी ३० टक्के हे किमान इतर दोन राज्यातून आलेले असू शकेल." |
| | | नवीन<br>प्रकरण एक अ नंतर | प्रकरण एक-अअ<br>वखार किंवा साइलो किंवा शीतगृह, इत्यादींचे बाजार उप-तळ म्हणून कार्य. |
| ३८ | ५ (क-ब) | नवीन | (१) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असल तो खेरीज करुन, राज्य शासनास, अधिसूचनेद्वारे बाजार उप-तळ म्हणून कार्य करण्याकरिता, वखार, साइलो, किंवा शीतगृह किंवा विहित केल्याप्रमाणे पायाभूत सुविधा व सोयी असलेल्या अशा इतर संरचना किंवा जागा यांना घोषित करता येईल.<br>**स्पष्टीकरण-** या पोट कलमान्वये "ठिकाण" या शब्दप्रयोगामध्ये कोणतीही संरचना, कुंपण, मोकळी जागा, स्थान, रस्ता तसेच बांधाबांध गृह किंवा सफाई प्रतवारी व प्रक्रिया युनिट इत्यादी यांचा समावेश होईल.<br>(२) पोट-कलम (१) अन्वये बाजार उप-तळ जागा म्हणून असे ठिकाण घोषित करुन इच्छिणारा, अशा वखारीचा किंवा शीतगृहाचा किंवा अशा इतर संरचनेचा किंवा यथास्थिती, जागेचा मालक, संचालकाकडे किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे विहीत करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, अशा फीसह, तसेच तीन वर्षापेक्षा कमी नसेल अशा विहित करण्यात येईल त्या कालावधीकरिता अर्ज करील.<br>(३) अशा वखारीच्या साइलोच्या किंवा शीतगृहाच्या किंवा अश इतर संरचनेच्या किंवा जागेच्या लायसनधारकाला, शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल त्या दरापेक्षा अधिक नसेल अशा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | यथामूल्य दराने घोषित केलेल्या बाजार उप-तळावर व्यवहार केलेल्या कृषि उत्पन्नावर उपभोक्ता आकार, वसूल करता येईल.<br>परंतु, कोणताही उपभोक्ता आकार शेतकरी-विक्रेत्याकडून वसूल केला जाणार नाही.<br>(४)घोषित केलेला बाजार उप-तळ लायसनधारक, बाजार समितीने कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये आकारलेल्या शुल्काच्या यथामूल्य टक्केवारीच्या दराने, संचालकाकडून ठेवण्यात येणाऱ्या स्वतंत्र "परिक्रामी पणन विकास निधी" ला अशा वसूल केलेल्या उपभोक्ता आकाराच्या शुल्कामधून अंशदान देईल. तो निधी, कृषि उत्पन्नाच्या पणन विकासाकरिता विहित करण्यात येईल अशा प्रयोजनाकरिता अशारीतीने वापरण्यात येईल." |
| ३९ | ५ड (६-क) | नवीन | "खाजगी बाजर तळातील प्रत्येक कृषि उत्पन्नाची, एकतर जाहीर लिलावाद्वारे किंवा इ-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. जेव्हा कोणत्याही जाहीर कृषि उत्पन्नाची खाजगी बाजारात जाहीर लिलावाद्वारे किंवा इ-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल तेव्हा त्याची सर्वोच्च बोलीदाराला विक्री करण्यात येईल. मात्र, विक्रेत्याला त्याचे उत्पन्न सर्वोच्च बोलीदाराला विकण्यास नकार देता येईल किंवा निम्नतम बोली स्वीकारात येईल किंवा त्याच्या उत्पन्नाची विक्री काही तासापर्यंत किंवा नंतरच्या दिनांकापर्यंत पुढे ढकलता येईल.<br>परंतु जो या पर्यायाचा वापर करील असा विकेता, खाजगी बाजार लायसनधारक, संबधित बाजारामध्ये लिलावासाठी किंवा इ-लिलावासाठी जी मुदत निश्चित करील अशी मुदत संपण्यापूर्वी संबधित व्यापाऱ्याला त्याचा निर्णय कळवील." |

| | | | |
|---|---|---|---|
| ४० | ६(४-क) | नवीन | या अधिनियमात तरतूद केली असेल त्याखेरीज, सर्व कृषि उत्पन्नाची या अधिनियमामध्ये लायसन दिलेल्या सर्वसाधारणपणे मुख्य बाजार तळात, उप-बाजार तळात, बाजार उप-तळात खाजगी बाजार तळात किंवा इलेक्ट्रॉनिक व्यापारी व्यासपीठात विक्री करण्यात येईल.<br>परंतु, कृषि उत्पन्नाची इतर ठिकाणी तसेच थेट पणन करण्याकरिता कलम ५ड अन्वये याबाबत विशेषत: अनुमती देण्यात आलेल्या लायसनधारकाला देखील इतर ठिकाणी विक्री करता येईल. |
| ४१ | ६ (४-ख) | नवीन | कृषि उत्पन्नासंबधात परिच्छेद (क) मधील कोणतीही गोष्ट ही, जेथे-<br>(एक) उत्पादकाने स्वत: कोणत्याही व्यक्तीला तिच्या घरगुती वापरासाठी नियमान्वये विहित करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत असलेल्या प्रमाणात विक्री केली असेल.<br>(दो) स्वत: डोक्यावर वाहून नेईल इतक्या वजनाचा माल विक्रीसाठी आणला असेल.<br>(तीन) किरकोळ व्यापाऱ्याने खरेदी व विक्री केली असेल<br>(चार) अधिकृत रास्त भावाच्या दुकानदाराने भारतीय अन्न महामंडळाकडून, “राज्य विक्रेय वस्तू व्यापार महामंडळाकडून” किंवा सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत आवश्यक विक्रेय वस्तूंच्या वितरणासाठी केंद्र सरकारने अथवा राज्य प्रशासनाने प्राधिकृत केलेले इतर कोणतीही अभिकरण किंवा संस्था यांच्याकडून खरेदी केली असेल, आणि<br>(पाँच) अशा कृषि उत्पन्नाचे सहकारी संस्थेकडून आगाऊ रक्कम घेण्याच्या प्रयोजनाकरिता त्या संस्थेकडे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | हस्तांतरण केले असेल, आणि<br>(सहा) महाराष्ट्र पंचायतीसंबधीच्या तरतुदी (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारण करणे) नियम, २०१४ अनुसार अनुसूचित क्षेत्रांतील गौण वन उत्पादन असेल- |
| ४२ | ६ (४-ग) | नवीन | पशुधनाच्या बाबतीत, पोट-कलम (१) मधल कोणतीही गोष्ट, अधिसूचित करण्यात येईल अशा मूल्यापेक्षा अधिक नसेल अशा पशुधनाच्या खरेदी किंवा विक्रीच्या व्यवसायला लागू होणार नाही. |
| ४३ | ६ (४-घ) | नवीन | मुख्य बाजार तळ, उप-बाजार तळ,, खाजगी बाजार तळ, बाजार उप-तळ येथे विक्रीसाठी आणलेल्या पशुधनासह कृषि उत्पन्नाची किंमत इ-लिलाव किंवा इतर कोणतीही पारदर्श पध्दती यांसह निविदा बोली किंवा खुल्या लिलावाद्वारे निश्चित करण्यात येईल आणि विक्रेत्याकडून जी कोणतीही कारणे असतील त्यामुळे मान्य किंमतीमध्ये कोणतीही कपात करण्यात येणार नाही. |
| ४४ | ६ (४-ड.) | नवीन | "अशाप्रकारे खरेदी केलेल्या सर्व कृषि उत्पन्नाचे वजन किंवा मोजमाप किंवा गणना ही उपविधीमध्ये तरतूद केली असेल अशा व्यक्तीद्वारे आणि अशा पध्दतीने किंवा संचालकाने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने या प्रयोजनाकरिता विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही ठिकाणी करण्यात येईल." |
| ४५ | ६ (अ-१) | नवीन | दोन व्यापा-यांमधील वाणिज्यिक व्यवहार वगळून, जी व्यक्ती मुख्य बाजार तळ, उप बाजार तळ, बाजार उप-तळ आणि खाजगी बाजार तळ किंवा इलेक्ट्रॉनिक व्यापार व्यासपीठातील कृषि उत्पन्न खरेदी करते अशी इतर कोणतीही व्यक्ती, आंतरराज्यीय व्यापार असल्यास तीन प्रतींमध्ये करार निष्पादित करील आणि राज्यांतर्गत व्यापार असल्यास विक्रेत्याच्या नावाने विहित करण्यात येईल अशा नमुन्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | तीन प्रतीमध्ये लेखा चिठ्ठी देईल. कराराची किंवा लेखा चिठ्ठीची एक प्रत खरेदीदार ठेवून घेईल, एक प्रत विक्रेत्याला पुरविण्यात येईल आणि उर्वरित प्रत बाजार समितीच्या अभिलेखात ठेवण्यात येईल. |
| ४६ | ६ (अ-२) (अ) | नवीन | मुख्य बाजार तळात, उप-बाजार तळात, खाजगी बाजार तळात, बाजार उप-तळात आणि इ-व्यासपीठातील सर्व व्यवहारांत, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक व्यवहार केलेल्या कृषि उत्पन्नाची किंमत, आदात्याच्या खात्यावरच जमा केलेल्या धनाकर्षाद्वारे, दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा आरटीजीस किंवा एनईएफटी यांसारख्या पैसा हस्तांतरण करण्याच्या इतर कोणत्याही इलेक्ट्रानिक पद्धतीने, विक्रेत्याला त्याच दिवशी किवा कार्यपद्धतीप्रमाणे असे करणे आवश्यक असल्यास, जास्तीत जास्त दुसऱ्या दिवशी प्रदान करण्यात येईल, मात्र अशा स्थगित प्रदानांच्या प्रकरणांमध्ये, खरेदीदाराने जी उधार व्यवहाराच्या आणि व्यापाऱ्याला केलेल्या प्रदानाच्या आधारे गतिमानरीत्या समायोजित केली जाते अशा त्याच्या पत मर्यादेप्रमाणे निश्चित करण्यात येते अशी प्रतिभूती बाजार समितीला देणे आवश्यक आहे. स्थगित प्रदानाचा व्यवहार असल्यास, अत्याधिक व्यापाराला परवानगी देण्यात येणार नाही. कृषि उत्पन्नावरील प्रदान, जर ते थेट पणन लायसनधारकाला विकण्यात आले असेल तर, त्याच ठिकाणी त्याच दिवशी किंवा इलेक्ट्रॉनिक व्यवहार असल्यास तत्कालीन दराने विक्रेत्या शेतकऱ्याला देखील देण्यात येईल. |
| ४७ | ६ (अ-२) (ब) | नवीन | खरेदीदाराने इलेक्ट्रॉनिक व्यापार व्यासपीठावर कृषि उत्पन्नाची बोली लावली असेल तर, त्याची बोली लावण्याची क्षमता ही, गतिशिल पत मर्यादेद्वारे मर्यादित करण्यात येईल आणि खरेदीदाराचे प्रदान |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | इलेक्ट्रॉनिक व्यापार व्यासपीठामार्फत या मर्यादपर्यंत खर्ची घालण्यात येईल. खरेदीदाराने, विक्रेत्याच्या संमतीने किंवा खंड (अ) अन्वये स्थगित प्रदानाचा पर्याय स्वीकारला असेल तर, तो विक्रेत्याला पाच दिवसांच्या आत प्रतिदिन देय असलेल्या कृषि उत्पन्नाच्या व पशुधनाच्या एकूण किमतीच्या एक टक्के दराने अतिरिक्त प्रदान करण्यास दायी असेल. अशा प्रकरणांमध्ये गतिशील पत मर्यादा, अतिरिक्त प्रदानाची रक्कम विचारात घेऊन कमी करण्यात येईल, जेणेकरून अत्याधिक व्यापाराला अनुमती दिली नाही याची सुनिश्चिती होईल. |
| ४८ | ६ (अ-३) | नवीन | अडत्या, नाशिवंत नसलेल्या कृषि उत्पन्नाच्या बाबतीत केलेल्या व्यवहारावर मूल्यानुसार तीन टक्क्यांहून अधिक नसेल इतक्या दराने त्याच्याकडून किंवा त्याच्या मुख्य व्यापा-याकडून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने निधीच्या हस्तांतरणामार्फत किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा आदात्याच्या खात्यावरच जमा होणाऱ्या धनाकर्षामार्फत त्याचे किंवा त्यावरील कमिशन वसूल करील नाशिवंत कृषि उत्पन्न असल्यास, त्याबाबतीत ते उत्पन्नाच्या साठवणीमध्ये आणि त्याने दिलेल्या इतर सेवांमध्ये त्याच्याकडून करण्यात आलेल्या अशा सर्व खर्चासह, व्यवहार केलेल्या उत्पन्नावर मूल्यानुसार सहा टक्क्यांहून अधिक नसेल :<br>परंतु, अडत्या हा, विक्रेता व खरेदीदार दोघांच्या वतीने अशा प्रकारचे काम करणार नाही आणि बाजार समितीचे व्यवस्थापन किवा खाजगी बाजार तळ यांच्या वतीने कृषि उत्पन्नाचा लिलाव करणार नाही:<br>परंतु आणखी असे की, अडत्या हा, विक्रेत्याच्या वतीने रोख रक्कम स्वीकारणार नाही किंवा आपल्या स्वतः च्या खात्यातून, कृषि |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | उत्पन्नाची किंमत खरेदीदाराच्या वतीने विक्रेत्याला प्रदान करणार नाही. |
| ४९ | १३अ | नवीन | राज्य शासन, राष्ट्रीय नामांकित बाजार तळाच्या बाजार समितीवर पुढील व्यक्तींना नामनिर्देशित करील, -<br>(एक) सभापती-पणन मंत्री किंवा राज्य शासनास योग्य वाटेल अशी इतर कोणतीही व्यक्ती.<br>(दोन) उप सभापती-अपर निबंधक, सहकार याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा कोणताही अधिकारी :<br>(तीन) महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक महसूल विभागातून एक याप्रमाणे, सहा शेतकरी;<br>(चार) राष्ट्रीय नामांकित बाजार तळात जेथून जास्तीत जास्त कृषि उत्पन्न येते त्या दुसऱ्या दोन राज्यातून एक याप्रमाणे, त्या संबंधित इतर राज्य शासनांनी शिफारस केलेले दोन शेतकरी<br>(पाच) संबंधित राष्ट्रीय नामांकित बाजार तळाचे व्यापारी लायसन धारण करणारे पाच सदस्य:<br>(सहा) कृषि व प्रक्रियित अन्न पदार्थ निर्यात विकास प्राधिकरणाचा एक प्रतिनिधी<br>(सात) केंद्रीय वखार महामंडळ किंवा राज्य वखार महामंडळ यांसह अधिकृत वखार चालकांचे प्रतिनिधीत्त्व करणारा एक प्रतिनिधी :<br>(आठ) रेल्वे कडरूळ सुविधा (Railway Siding Facility) पुरविणाऱ्या भारतीय रेल्वेचा एक प्रतिनिधी ;<br>(नऊ) भारत सरकारच्या सीमा शुल्क विभागाचा एक प्रतिनिधी :<br>(दहा) राष्ट्रीय नामांकित बाजार तळास सेवा देणाऱ्या बँकांचा एक प्रतिनिधी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (अकरा) भारत सरकारचा कृषि पणन सल्लागार किंवा भारत सरकारच्या अवर सचिवाच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाची नसलेली त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती :<br>(बारा) मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्या क्षेत्राचा नगरपालिका आयुक्त किंवा त्याचा नामनिर्देशिती;<br>(तेरा) सहकार विभागाच्या सह निबंधकाच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसेल असा, राज्य शासनाने नियुक्त करावयाचा कार्यकारी सदस्य, जो राष्ट्रीय नामांकित बाजार तळाच्या बाजार समितीचा सचिव किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्य करील :<br>परंतु, राज्य शासनाने, राष्ट्रीय नामांकित बाजार तळाची अधिसूचना प्रसिद्ध केल्यानंतर लगेच विद्यमान बाजार समिती कार्य करणे बंद करील आणि सर्व विद्यमान समिती सदस्य हे आपले पद धारण करणे बंद करतील. |
| ५१ | १३ब | नवीन | (१) बाजार समिती, राष्ट्रीय नामांकित बाजारतळासाठी आपल्या सदस्यांमधून कार्यकारी समितीची नियुक्ती करील.<br>(२) राष्ट्रीय नामांकित बाजारतळाची कार्यकारी समिती, विहित करण्यात येईल अशा सदस्य संख्येने घटित होईल आणि ती अशी कार्यपद्धती अनुसरील.<br>(३) आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत कार्यकारी समितीस, राष्ट्रीय नामांकित बाजारतळाच्या बाजार समितीची मान्यता घेणे आवश्यक असेल अशा वादप्रश्नांवर निर्णय घेता येईल :<br>परंतु, असे निर्णय घेतल्याच्या दिनांकानंतरच्या पुढील सभेमध्ये राष्ट्रीय नामांकित बाजारतळाच्या बाजार समितीची अशा निर्णयांना |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मान्यता घेण्यात येईल. अशी मान्यता न घेतल्यास किंवा राष्ट्रीय नामांकित बाजारतळाच्या बाजार समितीने अशा निर्णयांना मान्यता न दिल्यास, असे निर्णय रद्दबातल होतील, तथापि, अशा कोणत्याही अमान्यतेमुळे, त्या निर्णयान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधलेला बाध येणार नाही :<br>परंतु आणखी असे की, राष्ट्रीय नामांकित बाजारतळाच्या बाजार समितीने अशा निर्णयामध्ये कोणतेही फेरबदल केल्यास, तो निर्णय, असे फेरबदल केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल.<br>(३) कार्यकारी समितीची आवश्यकता वाटेल तितक्यावेळा परंतु, महिन्यातून किमान एकदा सभा लावण्यात येईल. |
| ५२ | १३क | नवीन | राष्ट्रीय नामांकित बाजारतळासाठी विनिर्दिष्ट करण्यात न आलेल्या या अधिनियमाच्या सर्व इतर तरतुदी हया, कलम ५कअ अन्वये याबाबतीत केलेल्या निमयांद्वारे अन्यथा विनिर्दिष्ट केले नसेल तर, योग्य त्या फेर फेरांसह, राष्ट्रीय नामांकीत बाजारतळाला लागू होती. |
| ५३ | ६० (२) (अ-अ) | नवीन | (अ-अ) कलम ५कअ खाली-<br>(एक) राष्ट्रीय नामांकित बाजारतळामधील पणनाच्या विनियमनाची रीत विहीत करणे<br>(दोन) राष्ट्रीय नामांकित बाजारतळ म्हणन दर्जा प्रदान करण्याच्या प्रयोजनार्थ, बाजार तळामध्ये उलाढाल करण्यात येणाऱ्या कृषि उत्पन्नाच्या वार्षिक टनभाराची किंवा वार्षिक मूल्याची किमान मर्यादा विहित करणे. |
| ५४ | ६० (२) (अ-ब) | नवीन | (अ-ब) कलम ५क ब खालील —<br>(एक) त्याच्या पोट-कलम (१) अन्वये वखार, साइलो, शीतगृह |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | किंवा अशी इतर संरचना किंवा जागा यांना उपबाजार उप-तळ म्हणून घोषित करण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सोयी व सुविधा विहीत करणे<br>(दोन) त्याच्या पोट कलम (२) अन्वये, त्याखाली अर्ज करण्याच्या प्रयोजनासाठी, अर्जाचा नमुना रीत आणि फी आणि त्याकरिता तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतका कालावधी विहीत करणे:<br>(तीन) त्याच्या पोट कलम (४) अन्वये, कृषि उत्पन्नाचा पणन विकासाकरिता, परिक्रामी बाजार विकास निधीचा वापराची प्रयोजने आणि त्याच्या वापराची रीत, विहीत करणे. |
| ५५ | ६० (अ-७) | नवीन | कलम ६ च्या पोट कलम (४) च्या परिच्छेद (ब) च्या खंड (एक) अन्वये, उक्त परिच्छेद (ब) च्या प्रयोजनार्थ स्वत: उत्पादकाने कोणत्याही व्यक्तीला तिच्या घरगुती वापरासाठी ज्या प्रमाणात विक्री केलेला असेल, त्या विक्रीची मर्यादा, विहीत करणे. |
| ५६ | ६० (अ-८) | नवीन | कलम ६ अ खालील, त्याचा पोट कलम (१) अन्वये, आंतरराज्यीय व्यापाऱ्याच्या बाबतीत, कराराचा नमुना आणि राज्यांतर्गत व्यापाऱ्यांच्या बाबतीत, लेखाचिठ्ठीचा नमुना विहीत करणे |
| ५७ | ६० (अ) (क-२) | नवीन | खंड १३ब खालील, त्याचा पोट कलम (२) अन्वये, राष्ट्रीय नामांकित बाजार तळाचा कार्यकारी समितीच्या सदस्यांची संख्या आणि तिने अनुसरावयाचे कार्यपध्दती, विहीत करणे. |